माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्रं.शावैमअ/आस्थापना-राजप/विनंम/रिक्त पदे/जाहिरात/९३३८ /२०२३ दिनांक. ०३/०८/२०२३

## : जाहिरात :

विषय :- कनिष्ठ निवासी या संवर्गातील रिक्त होणारी पदे कत्रांटी/१२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारसीनुसार भरण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन,वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,शा.नि.क्रं.एमईडी-२०१०/प्र.क्रं.७६(अ)/२०१०/शिक्षण-१,मंत्रालय,मुंबई दिं ३१.०१.२०१२.

२. महाराष्ट्र शासन,वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,शा.नि.क्रं.पदनि-२०२०/प्र.क्रं.१०८/२०२०/वैसेवा-२,दिनांक २९.०१.२०२१.

३. शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्रं.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१.०५.२०२१.

४. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८,दिनांक १४.०६.२०२१.

५. मा.संचालनालयाचे पत्र क्रं.संवैशिवसं/मध्यवर्ती निवड प्रक्रिया/पीजी विंटर-२०२०/१-अ,दिनांक २९.१०.२०२१.

६. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,बीसीसी-२०२१/प्र.क्रं.३८७/१६-ब(ए), दिनांक ०६.०७.२०२१.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार तसेच दैनदिन रुग्णसेवेच्या व विद्यार्थ्याच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातून शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अलिबाग (जि-रायगड) येथील महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ निवासी ची पदे १२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता पात्र असलेल्या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१. इच्छूक उमेदवारांनी दिनांक **०४/०८/२०२३ ते दिनांक ०९/०८/२०२३** या कालावधीत कार्यालयीन वेळेत विहित नमुना अर्ज प्राप्त करणे.

२. अर्जात नमूद प्रमाणपत्रे व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकिंत प्रती व अर्ज नमूना शुल्क भरल्याची पोच पावतीची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्र व कागदपत्रसह कार्यालयात विहित मुदतीमध्ये आवक-जावक विभागात सादर करुन त्याबाबतची पोच घ्यावी.

४. मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे.

५. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. सोबत जोडलेल्या रिक्त पदांच्या तपशिलात पदांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.करीता तपशिलात नमूद पदसंख्येत बदल (कमी/जास्त) होण्याची श्क्यता नाकारता येत नाही.

७. जाहिरातीच्या दिनांकापुर्वी नियुक्ती मिळणेबाबत अर्ज सादर केलेला असेल,अशा उमेदवारांनी नव्याने विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयास सादर करावा.पुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. तपशिलात दर्शविल्यानुसार रिक्त पदाच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येतील व तद्नंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

९. उमेदवाराने धारण केलेल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास एक महिन्याची पूर्व सूचना देणे आवश्यक आहे. अन्यथा नोटीस न देता कनिष्ठ निवासी यांनी पदाचा राजीनामा दिल्यास त्यांचे एक महिन्याचे वेतन/मानधन शासन तिजोरीत जमा करण्यात येईल याची उमेदवाराने नोद घ्यावी.

१०. बंधपत्रित उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल तसेच शासकीय व पालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातुन उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य राहील.

कनिष्ठ निवासी या संवर्गातील विभागनिहाय रिक्त पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

**कनिष्ठ निवासी रिक्त पदांचा तपशिल.**

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त होणा-या पदांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | कनिष्ठ निवासी | १० |

**शैक्षणिक अर्हता** :- पदवी अभ्यासक्रम(एम.बी.बी.एस.) उर्तीर्ण असणे आवश्यक.
**वेतन श्रेणी** :- रु ६६०० अधिक शासकीय अनुज्ञेय भत्ते

**मुलाखतीचा दिनांक १०/०८/२०२३** रोजी सकाळी **११.००** वाजता.तसेच पदे भरेपर्यंत महिन्याच्या दर मंगळवारी सकाळी ११ वाजता.
**मुलाखतीचे ठिकाण** :- मा.अधिष्ठाता,शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अलिबाग,रायगड यांचे दालनात.

विहित नमुन्यातील अर्जासोबत खालील शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करण्यात याव्यात.

१. प्रथम,द्वितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस गुणपत्रिकांची छायांकित प्रत.
२. प्रयत्न प्रमाणपत्र,आंतरवासिता प्रमाणपत्र.
३. एम.बी.बी.एस. पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र.
४. पदवी प्रयत्न प्रमाणपत्र.
५. महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र.
६. सदरील पदाचा अनुभव असल्यास, अनुभव प्रमाणपत्राची प्रत.
७. जन्म तारखेचे प्रमाणपत्र.
८. आधार कार्ड व पॅन कार्ड.
९. उमेदवाराच्या नावात बदल असल्यास गॅजेटची प्रत.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,
अलिबाग(जि.रायगड)

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
अलिबाग-रायगड

प्रति,

१. सुचना फलक- अधिष्ठाता कार्यालय/जिल्हारुग्णालय/मुला मुलींचे वसतिगृह शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अलिबाग.
२. सर्व अधिष्ठाता,शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय यांना विंनतीनुसार सविनय सादर त्यांनी आपआपल्या महाविद्यालय व रुग्णालय येथे सुचना फलकावर लावावे.

प्रत : १. मा.सचिव,वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.आयुक्त सो.(वै.शि.),संचालनालय,वैद्यकिय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.संचालक,संचालनालय,वैद्यकिय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.